स्थायी समितीच्या **शुक्रवार दिनांक 31–08–2018** रोजी **दुपारी 03–00** वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

## उपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| **1.** | **मा. श्री.विरेन्द्र उर्फ विक्की घनश्यामदास कुकरेजा** | **सभापती** |
| 2. | मा. श्री. मनोज दशरथ सांगोळे | सदस्य |
| 3. | मा. श्री.सुनिल दुलीचंद हिरणवार | सदस्य |
| 4. | मा. श्री.महेश केशवराव महाजन | सदस्य |
| 5. | मा. श्री.शेषराव शंकरराव गोतमारे | सदस्य |
| 6. | मा. सौ. सोनाली शालीक कडु | सदस्या |
| 7. | मा. सौ. मंगला शशांक खेकरे | सदस्या |
| 8. | मा. सौ. मनिषा चक्रधर अतकरे | सदस्या |
| 9. | मा. सौ. हर्षला मनोज उर्फ मोरेश्वर साबळे | सदस्या |
| 10. | मा. श्री. नागेश महादेव मानकर | सदस्य |
| 11. | मा. सौ. कल्पना राम कुंभलकर | सदस्या |
| 12. | मा. सौ. अर्चना विवेक पाठक | सदस्या |
| 13. | मा. सौ. विद्या राजेश कन्हेरे | सदस्या |
| 14. | मा. सौ. अभिरूची अनिल राजगिरे | सदस्या |
| 15. | मा. श्री. भुट्टो जुल्फेकार अहमद | सदस्य |
| 16. | मा. सौ. मंगला योगीराज लांजेवार | सदस्या |

## उपस्थित अधिकारी

1. श्री. अजिज शेख, अति. आयुक्त (2)
2. श्री. हरीश दुबे, निगम सचिव

मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेच्या कार्यवाहीला सुरुवात केली.

**ठराव क्रमांक 200:–** स्थायी समिती ठराव क्र. 154, दि. 28.09.2017 मधिल **{समाज कल्याण विभाग}** निर्देशन्वये नागपूर महानगरपालिका अंतर्गत स्पर्धा परिक्षा पुर्व प्रशिक्षण केंद्र सुरू करण्याकरिता नियुक्त करावयाचा संस्थेसाठी E.O.I. द्वारे आवेदन मागविण्याकरिता आवेदन कर्त्यांना आवश्यक असणारे निकष तसेच या योजनेअंतर्गत नियुक्त संस्थेला करावयाचे कार्य व या योजनेत समाविष्ट करावयाच्या लाभार्थ्याचे निकष ठरविण्याचा प्रश्न विचारात घेणे व सदर्हु कार्यास येणाऱ्या रू. 49,75,000/– प्रशासकिय खर्चास मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजुरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 201:–** OPD क्लिनिक (बाहयरुग्ण वैद्यकीय व्यवसायिक) **{आरोग्य विभाग}** नामांकनासाठी विभागाद्वारे वापरण्यात येणारे पुर्वनिकष कायम

ठेवून, मुख्यत: रहिवाशी सदनिकेतील रहिवाशी कुटुंबांना खाजगी क्लिनिक पासून त्रास होऊ नये व वैद्यकीय व्यवसायिकांच्या बाहयरुग्ण व्यवसायाबाबत अधिकारांचे हनन होणार नाही. या बाबी विचारात घेऊन आरोग्य विभागाद्वारे निकष प्रस्तावित करण्यात आले होते. सदर निकषात वैद्यकीय सेवा व आरोग्य विशेष समिती सभा दि. १२/१०/२०१७ मधील सुचनेप्रमाणे बदल/सुधारणा सह प्रस्ताव सभागृहाकडे चर्चेकरीता सादर करण्यात आला असता सदर प्रश्न सभागृहाने विचारात घेऊन या धोरणा संदर्भात अनेक सुचना असल्यामुळे सर्वकष धोरण ठरविण्याकरीता हा विषय आरोग्य समितीकडे अग्रेषीत करण्यात यावा असे नागपूर महानगरपालिकेच्या दि. ०८/१२/२०१७ रोजी भरलेल्या सर्वसाधारण सभेच्या ठराव क्र. १५६ मधील निर्देशाप्रमाणे आरोग्य समितीकडे अग्रेषीत करण्यात आला.

वरील निर्देशाप्रमाणे दि. ०६/०२/२०१८ मधील वैद्यकीय सेवा व आरोग्य विशेष समिती मा. सभापती यांचे निर्देशाप्रमाणे, दि. १२/१०/२०१७ रोजीच्या सभेत ओपीडी क्लिनिक व्यवसायिक नामांकनासाठी ठरविण्यात आलेले खालीलप्रमाणे शुल्क हे एप्रिल २०१८ पासून लागू करण्यासाठी मनपा सभागृहाची मंजूरी घेऊन कार्यवाही करावी अशी समितीने शिफारस केलेली आहे.

| अ. क्र. | व्यवसायिक संरचना | पुर्व स्थापीत वार्षिक शुल्क | १ एप्रिल २०१८ पासून आकारण्यात येणारे प्रस्तावित वार्षिक शुल्क | आरोग्य समिती सभा दि. १२.१०.२०१७ च्या सुचनेप्रमाणे बदल/सुधारणा |
|---|---|---|---|---|
| १ | जनरल बाहयरुग्ण व्यवसाय (ओपीडी क्लिनिक) | ५००/— रु. | १०००/— रु. | २०००/— रु. |
| २ | मल्टीस्पेशालिटी व्यवसाय बाहयरुग्ण (ओपीडी क्लिनिक) | ५००/— रु. | ३०००/— रु. | ४०००/— रु. |
| ३ | नेत्र चिकित्सा/दंत चिकित्सा व्यवसाय (ओपीडी क्लिनिक) | ५००/— रु. | २०००/— रु. | ४०००/— रु. |
| ४ | धर्मार्थ दवाखाना बाहयरुग्ण ओपीडी क्लिनिक | ५००/— रु. | १०००/— रु. | अनुमोदीत |
| ५ | पॅथालॉजी लेबोरेटरी | १०००/— रु. | ३०००/— रु. | ४०००/— रु. |
| ६ | रक्तपेढी (ब्लड बॅक) | १०००/— रु. | २०००/— रु. | अनुमोदीत |

उपरोक्त सुधारीत ओपीडी नामांकन शुल्क दि. ०१ एप्रिल २०१८ पासून लागू करण्याचा प्रश्न सभागृहाने विचारात घेऊन हा विषय स्थायी समितीकडे पाठविण्यात यावा व स्थायी समितीने दरवाढीचे दर व नियम याचा अभ्यास करुन विषय महासभेकडे सादर करावा, असे नागपूर महानगरपालिकेच्या दि. ०२/०७/२०१८ रोजी भरलेल्या स्थगीत सर्वसाधारण सभेच्या कार्यवृत्तातुन घेतलेला उतारा ठराव क्र. २३९ चे अनुपालनास्तव उपरोक्त ओपीडी नामांकन शुल्क लागु करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन आरोग्य समिती यांनी शिफारस केलेल्या दरास ही स्थायी समिती एकमताने मंजूरी प्रदान करते, तसेच अंतिम मंजूरी करीता विषय सभागृहाकडे पाठविण्याची शिफारस करण्यांत येते यांस समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 202:—</u> प्रभाग क्र. ०१ ड मध्ये जरीपटका पोलीस स्टेशन रिंग {लोककर्म झोन 10} रोड चौक ते नारा घाट पर्यंत भुमिगत पाईप लाईन टाकणेबाबत मागविण्यात आलेल्या ई निविदातील एकुण ३ प्राप्त निविदापैकी मे. ब्रजेश मिश्रा यांची मुळ प्राकलनीय राशी पेक्षा ११.३०% कमी दराची राशी रू. ३१,२३,४९९/— (ऐकतीस

लक्ष तेवीस हजार चारशे नव्व्यांनव रूपये फक्त) रकमेची प्रथम निम्नतम दराची निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन,

स्थायी समिती ठराव क्र. ३६ दि. १६.०४.२०१८ नुसार सन २०१८ – २०१९ च्या अर्थसंकल्पा मधून रू. ३१,२३,४९९/– चे प्रावधान नोंदवून प्रस्ताव पुनश्चः स्थायी समितीपुढे सादर करण्यात येत आहे.

उपरोक्त प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजुरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 203:–</u>
{लोककर्म झोन 09}

प्रभाग क्र. 2 (ड) अंतर्गत कामगारनगर चौक रिंग रोड येथील नाल्यावरील पडलेल्या पुलाचे बांधकाम करण्याच्या प्राकलनीय रक्कम रु. 28,95,892/– व निविदा किंमत रु. 24,74727/– च्या कामाकरिता प्राप्त तीन निविदांपैकी, मे. श्रम साफल्य इंटरप्राईजेस यांच्या, निविदा किंमती पेक्षा 0.79 टक्के कमी दराच्या रू. 24,55,176/– च्या निम्नतम निविदेस तथा त्यावरील 12 टक्के जी.एस.टी व 1 टक्का चाचणी शुल्क इत्यादी सह एकूण रु.27,74,348/–(रुपये सत्तावीस लक्ष चौ–याहत्तर हजार तिनशे अठ्ठेचाळीस) च्या कार्यराशीस मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न तसेच सदर्हु कामाकरिता पद क्र. A28801332203 अंतर्गत रु. 28,95,892/– चे प्रावधान उपलब्ध करण्यात आले असून कामाचा खर्च तरतूद राशी पर्यंत मर्यादित करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजुरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 204:–</u>
{आरोग्य विभाग}

नागपूर शहरातील घरोघरीचा कचरा संकलन व वाहतुकीचे काम कनक रिसोर्सेस मॅनेजमेंट लिमिटेड हया एजन्सीला दि. 01.03.2018 रोजीचे त्यांचेशी झालेला करारनुसार देण्यात आले आहे. त्यावेळी प्रत्यक्ष कामास सुरवात दि. 01.06.2008 रोजी झाली होती. आणि तदनंतर स्थायी समिती ठराव क्र. 39 दि. 12/06/2014 नुसार त्यांची कामाची मुदत दि. 15/02/2019 पर्यंत आहे.

सदर मुदत समाप्ती नंतर हे काम करण्यासाठी नविन एजन्सी नियुक्त करण्याकरीता निविदा प्रक्रिया करावी लागणारा आहे. सध्यास्थितीत विद्यमान एजन्सीचे गेल्या 12 महिन्याचे देयक रू. 58,48,46,030/– (जुलै 2017 ते जुन 2018) आले होते, हे लक्षात घेता प्रस्तावित निविदा 10 वर्षासाठी मागवावयाच्या झाल्यास विद्यमान दरानुसार ढोबळ मनाने वार्षिक रू. 65 कोटी खर्च अपेक्षित आहे, अर्थात निविदा प्रक्रिये अंती प्राप्त होणाऱ्या दरांबाबत सध्याच अंदाज करता येणे शक्य नाही.

हया कामी येणारा खर्च पद क्र A24101231701 करीता असलेला अर्थ संकल्पीय तरतूद रू. 67 कोटी मधून केला जाईल.

अशा कामासाठी Design, Build, Finance, Operate and transfer (DBFOT) तत्वावर सध्याच्या एजन्सीला दिले असुन त्याच तत्वावर देणे प्रस्तावीत आहे. यात येणारी एजन्सी कामाचे नियोजन संकल्पन ठरवेल, त्याप्रमाणे यंत्रणा निर्माण करेल, त्यासाठी एजन्सीच आर्थिक तरतूद करेल. प्रत्यक्ष कार्यान्वीत करेल. आणि करार संपल्यानंतर या कामी मनपाची वापरलेली अचल संपत्ती जसे ट्रान्सफर स्टेशनची जागा, वर्कशॉप, पॉर्कीगसाठी दिलेल्या जागा मनपास परत करेल. हे तत्व राहील.

सदर काम विद्यमान दराने वार्षिक रु. 65 कोटी अपेक्षित खर्चाचे आहे. अशा कामासाठी निविदा प्रारुप तयार करणे, त्यासाठी देशातील अन्य मनपातील निविदांचा, बेस्ट प्रॅक्टीसेसचा अंतर्भाव करणे, प्री बीड मिटींग मध्ये उपस्थित होणाऱ्या मुद्यांवर खुलासे सादर करणे, निविदा प्रक्रीया राबविणे, करारनामा करुन प्रत्यक्ष कामास सुरुवात करुन देणे. या कामावर भविष्यातील निगराणीसाठी म्हणजे करारापासून ते करार कालावधीतील सर्व उपांगांची उभारणी व अंमलबजावणी वर लक्ष ठेवण्यासाठी हा इंडिपेंडेंट इंजिनिअर नेमणुकीची प्रक्रीया करुन देणे अशा कामांसाठी मनपात प्रशिक्षीत मनुष्यबळ नाही. करीता या कामासाठी सल्लागार नेमणे आवश्यक आहे.

सदर निविदा मागविण्यासाठी पूर्व तयारी म्हणुन मनपाच्या स्थायी समिती ठरावाद्वारे ठरवून दिलेल्या दरांनुसार मनपा पॅनलवर असलेल्या सल्लागारापैकी घनकचरा व्यवस्थापन

अनुषंगीक कामाचा अनुभव असणाऱ्या में. आर जगताप ॲन्ड असोसिएट्स नागपूर यांच्या नावाचा विचार करण्यात आला. त्यांनी आजवर मनपासाठी स्वच्छ भारत मिशन अंतर्गत रु. 308 कोटी अपेक्षित खर्चाचा DPR तयार करुन दिला आहे. त्या अंतर्गतच्या वेस्ट टू एजन्सी प्रकल्पासाठी सल्लागार म्हणुन काम केले आहे. भांडेवाडी येथील सॅनिटरी लॅन्ड फिल साईट निर्माण करण्याच्या कामासाठी निविदा प्रक्रीया केली आहे. हे लक्षात घेता तत्कालीन मा. आयुक्तांशी चर्चा करुन निविदा प्रारुप तयार करण्याच्या मौखिक सूचना त्यांना दिल्या होत्या. निविदा कशा प्रकारची असावी यावर सविस्तर चर्चा करण्यासाठी मा. आयुक्तांनी रविवार दि. 01/10/2017 रोजी श्री. जगताप यांचे पॉवर पॉईंट प्रेजेंटेशन घेतले आहे. तथापि त्यांना औपचारीक वर्क ऑर्डर द्यावयाची आहे.

वर नमूद मनपाच्या स्थायी समितीद्वारे निश्चित करुन दिलेल्या दरानूसार मनपास सेवा देणाऱ्या सल्लागारांच्या यादीत अनु क्रं. 20 वर मे. आर. जगताप यांचे नाव समाविष्ट आहे. आणि मनपा अंतर्गत विविध विभागांना उक्त सल्लागारांच्या सेवा घेणे शक्य व्हावे याकरीता मा शहर अभियंता यांना दि. 10/12/2009 द्वारे परीपत्रक निर्गमित केले आहे. आणि स्थायी समिती ठराव क्रं. 49 दि. 20/01/2016 द्वारे काही सुधारणा केल्या आहेत. सदर यादीचे अवलोकन केले असता आर जगताप यांच्या सेवा ब्रीजेस, कल्वर्टस ROB, RUB, Building Works, Commercial Complex/ Civil works in gardens/crematoriums, Roads and , road side, drainage works, servers & drainage, garden & Land Scaping, other than civil work & Interior decoration works असे नमुद आहे. यामध्ये सिवर, ड्रेनेज, इत्यादी आरोग्यांशी संबंधीत कामे असलीतरी घनकचरा व्यवस्थापन असाथेट उल्लेख नाही. त्यामुळे यापुर्वी त्यांना घनकचरा व्यवस्थापनांतर्गत वर नमूद स्वच्छ भारत मिशन अंतर्गत रु. 308 कोटीचा DPR करणे, वेस्ट टू एनर्जी प्रकल्पाचे काम देणे इत्यादी बाबी त्या त्या वेळी मा. स्थायी समितीच्या मान्यतेने केल्या आहेत. याबाबत विद्यमान मा. आयुक्तांशी चर्चा केली असता त्यांचे सूचनानूसार प्रथम अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था, मुंबई यांना सल्लागार नेमण्याचा विचार केला असता त्यांनी रु. 7.40 लक्ष अधिक टॅक्स असा दर दिला व निविदा तयार करण्यासाठी दोन महिने वेळ लागेल असे स्पष्ट केले, निविदा मागविण्याची निकड लक्षात घेता आर जगताप यांच्याकडून स्वतंत्रपणे दर मागविण्याच्या सूचना मा. आयुक्तांनी दिल्या त्यानुसार त्यांनी रु. 6.75 लक्ष अधिक टॅक्सेस असा दर नमुद केला आहे. त्यांना वर नमुद कामाचा अनुभव आहे, ते स्थानिक आहेत, आणि त्यांचे दर पॅनलवर ठरवून दिलेल्या दंरापेक्षा (9 लक्ष रुपये) व अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थे पेक्षाही कमी आहेत.

मे. आर. जगताप यांना सदर काम देण्यासाठी मनपा अधिनियम प्रकरण 5 मधील तरतुदीनूसार स्थायी समिती हे सक्षम प्राधिकरण असल्यामुळे वरील प्रमाणे घनकचरा व्यवस्थापनातंर्गत घरोघरीचा कचरा संकलन व वाहतूकीच्या कामाच्या निविदा प्रक्रीये करीता में. आर जगताप यांना सल्लागार म्हणुन नेमण्याच्या प्रस्तावावर विचार विनिमय करून निर्णय घेणे. तसेच निविदा दस्तावेज व प्रपत्र तयार झाल्यावर विभागाद्वारे निविदा मागविण्याची मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजुरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 205:— {वाहतुक विभाग} व्हेरायटी चौकातील मुंजे चौकाकडे जाणाऱ्या रस्त्यावरील जाहीरातीची गॅन्ट्री महामेट्रोच्या बांधकामात बाधीत होत असल्यामुळे म.न.पा. व महामेट्रोचे अधिकारी यांचे उपस्थितीत काढलेली असून त्या ऐवजी त्यांच्या अस्तित्वात असलेल्या (1) व्हेरायटी चौक येथील शंकर भोजनालय समोर व (2) लक्ष्मीभुवन चौक येथील सुदामा टॉकीज जवळ या दोन्ही गॅन्ट्रींना दिनांक 30/05/2020 ते दिनांक 29.05.2021 पर्यंत एक वर्षाची मुदतवाढ देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजुरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 206:— {क्रीडा व सांस्कृतीक विभाग} नागपूर महानगरपालिका तथा महाराष्ट्र बॉक्सिंग असो. तथा नागपूर महानगर बॉक्सिंग असो. यांच्या संयुक्त विद्यमाने “महापौर चषक” १ ली सबज्युनियर महिला राष्ट्रीय बॉक्सिंग स्पर्धा दिनांक १ ते ७

सप्टेंबर २०१८ कालावधित आयोजित आहे. या स्पर्धेतील सहभागी खेळाडूंची निवास व्यवस्था आमदार निवास येथे तथा ऑफिसियल व पंच यांची निवास व्यवस्था राणी कोठी, सिव्हिल लाईन्य येथे करण्यात येणार आहे. तथा त्यांची भोजन व्यवस्था, रोख बक्षिस व चषक, मेडल्स व्यवस्था म.न.पा. तर्फे करण्यात येणार आहे. याकरीता एकूण रू. ३३,२४,८००/— खर्च अपेक्षित आहे. भोजन व्यवस्था निविदा प्रक्रिया द्वारे करण्यात येईल. स्पर्धेचा अवधी कमी असल्यामुळे निविदा प्रक्रिया पुर्णत्वास न आल्यास शासकीय दरान्वये वाटाघाटी करवुन ही व्यवस्था करावी लागेल.

करीता उपरोक्त प्रस्तावास वित्तिय तथा प्रशासकीय मान्यता देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन सब ज्युनिअर महिला राष्ट्रीय बॉक्सिंग स्पर्धा 01.09.2018 पासुन सुरु होणार असल्यामुळे भोजन व्यवस्थेची निविदा प्रक्रिया पूर्ण होऊ शकत नाही असे विभागाचे मत असल्यामुळे शासकीय दराप्रमाणे भोजन व्यवस्थेचे कार्य विभागाने करावे असे ही स्थायी समिति निर्देश देते यासह विषयास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली. हा खर्च पद क्र. (476) A 26502242211 मधुन करण्यात येईल.

**ठराव क्रमांक 207:—** {लोककर्म झोन 10} प्रभाग क्र. १० अ व ड गाडगेबाबा सोसायटी, शिलानगर, दशरथ नगर येथील रस्त्यांचे डांबरीकरण करणेबाबत मागविण्यात आलेल्या ई निविदातील एकुण ३ प्राप्त निविदापैकी मे. आर. एम. गोपलानी यांची वाटाघाटी अंती मुळ प्राकलनीय राशी पेक्षा १०.००% कमी दराची राशी रू. २६,९७,०४२/— (सव्वीस लक्ष सत्त्यानऊ हजार बेचाळीस रूपये फक्त) रकमेची प्रथम निम्नतम दराची निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन,

स्थायी समिती ठराव क्र. ५३ दि. १६.०४.२०१८ नुसार सन २०१८ — २०१९ च्या अर्थसंकल्पा मधून रू. २६,९७,०४२/— चे प्रावधान नोंदवून प्रस्ताव पुनश्चः स्थायी समितीपुढे सादर करण्यात येत आहे.

उपरोक्त प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजुरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 208:—** {लोककर्म झोन 7} प्रभाग क्र. 20 (ड) अंतर्गत नाईक तलाव ते बांगला देश पोलीस चौकी पर्यंत सिमेंट रोडचे बांधकाम करण्यास्तव प्राप्त सात निविदांपैकी मे. उल्हास इंटरप्राईजेस यांची मुळ प्राकलनीय राशी रु. 48,38,968/— पेक्षा 14.25 टक्के कमी दराची रू. 4149415/— (रूपये एकेचाळीस लक्ष एकोणपन्नास हजार चारशे पंधरा) ची निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न तसेच हे काम पद क्र. 679(A42001470511) अंतर्गत प्रस्तावित असल्याने कामाचा खर्च प्रावधान राशी सीमित ठेवण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजुरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 209:—** {लोककर्म झोन 9} प्रभाग क्र. 2 (ड) येथील नारी घाटा जवळ, पीवळया नदीवर नविन पुलाचे बांधकाम करण्यास्तव रु. 3,34,68,772 /— रकमेच्या प्राकलनास मंजूरी प्रदान करून निविदा मागविण्यास मान्यता देणे तसेच या कामाकरिता प्रकल्प सल्लागार ने एस.पी.डी. इन्फ्रास्ट्रक्चर कन्सलटंट यांची विहीत अटी शर्तीवर रु. 8,62,003/—एवढया शुल्कावर नियुक्ती करण्यास मान्यता देणे आणी सदर्हु काम वर्ष 2018—19 मधे उपलब्ध तरतूद रु. 2,00,00,000/— (रु. दोनशे लक्ष) पर्यंत मर्यादीत ठेवून उर्वरित काम पुढे निधीच्या उपलब्धतेनुसार करण्यास मंजूरी देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजुरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 210:—** {सा.प्र. विभाग} म.न.पा. स्थायी समिती ठराव क्र. 859, दि. 26/12/2016 नुसार अग्निशामक विभागातील कर्मचाऱ्यांचे संख्याबळ व अग्निशामक विभागाचे महत्व लक्षांत घेता शासन निर्णय दि. 8 जानेवारी 2016 नुसार फायरमन

ड्रायव्हर चे कामाकरीता अग्निशमन सेवेतुन सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांना कंत्राटी तत्वावर प्रथमतः 11 महिन्याच्या कालावधीकरीता नियमित स्वरूपाचे कामासाठी नियुक्त न करता जेव्हापर्यंत म.न.पा.तर्फे नियमित भरती प्रक्रिया पूर्ण होत नाही त्या कालावधीकरीता विवक्षित कामासाठी जाहीरात क्र. 45/जस/2017 दि. 11/05/2017 अन्वये जाहीरात देण्यात आलेली होती.

उपरोक्त जाहीरातीच्या अनुषंगाने अग्निशामक विभागाची निकड लक्षांत घेता 06 महिन्याच्या कालावधीकरीता आदेश क्र. 108/ओ.ॲन्ड.एम दि. 24/07/2017 नुसार फायरमन ड्रायव्हर –05 व आदेश क्र. 109/ओ.ॲन्ड.एम दि. 24/07/2017 अन्वये फायरमन – 21 अश्या उमेदरवारांची शारिरीक तपासणी करून निवड करण्यात येवून कंत्राटी तत्वावर नियुक्ती करण्यात आलेल्या कंत्राटी कर्मचा–यांचा 6 महिन्याचा कालावधी दि. 29/07/2018 ला संपल्यामुळे व विभागाने शिफारशीनुसार व आवश्यकतेनुसार त्यांना दोन दिवसाचा तांत्रीक खंड देवून दि. 01/08/2018 पासुन पूढील 6 महिन्याकरीता किंवा म.न.पा.तर्फे नियमित भरती प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत यापैकी जे आधी घडेल तोपर्यंत या विवक्षित कामासाठी वरील फायरमन ड्रायव्हर–4 व फायरमन–16 अश्या एकुण 20 कंत्राटी कर्मचा–यांना मुदतवाढ देण्याचा व 6 महिन्याकरीता लागणा–या अंदाजे रू. 24 लक्ष खर्चास मान्यता देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजुरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 211</u>:– {लोककर्म–झोन क्र.10}

प्रभाग क्र. १ ड जरिपटका मधील सेथिया चौक ते कुकरेजा नगर पर्यंत सिमेंट रस्त्यांचे बांधकाम करणेबाबत मागविण्यात आलेल्या ई निविदातील एकुण ८ प्राप्त निविदापैकी मे. मुकेश कंस्ट्रक्शन यांची मुळ प्राकलनीय राशी पेक्षा १५.७१% कमी दराची राशी रू. ६४८५७२६/– (चौसठ लक्ष पंच्यांशी हजार सातशे सव्वीस रूपये फक्त) रकमेची प्रथम निम्नतम दराची निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजुरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 212</u>:– {कर व कर आकारणी विभाग}

कर व कर आकारणी विभागाचे दि. 1 एप्रिल, 2018 पासून ते आज पर्यंत झालेली वसुलीबाबतचा आढावा समितीने विचारात घेऊन कर व कर आकारणी विभाग हे उत्पन्न स्त्रोताचा प्रमुख विभाग आहे हया विभागात वसुली चे कर्मचाऱ्यांची कमतरता आहे. असे मत विभागाचे आहे. पुढील स्थायी समिती च्या सभेपुर्वी आयुक्त, म.न.पा. यांची या सर्व बाबींचा अभ्यास करुन अहवाल सादर करावा असे निर्देश देवून यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 213</u>:– {बाजार विभाग}

बाजार विभागाद्वारे दि. 1 एप्रिल, 2018 पासून ते आज पर्यंत झालेली वसुलीबाबतचा आढावा समितीने विचारात घेऊन नागपूर शहरातील म.न.पा.चे मार्केट व जागा यामध्ये व आजुबाजुचे सर्व अतिक्रमण एकमहिण्याचे आत काढावे तसेच नविन दराप्रमाणे 25.00 कोटी चे टारगेट पुर्ण करण्याचे निर्देश ही स्थायी समिती देते यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 214</u>:– {स्थावर विभाग}

स्थावर विभागाद्वारे दि. 1 एप्रिल, 2018 पासून ते आज पर्यंत झालेली वसुलीबाबतचा आढावा समितीने विचारात घेऊन विभागामध्ये असणारे जुने दस्त ऐवज स्कॅनिंग करण्याचे काम एक महीन्याचे आत पूर्ण करण्याचे व त्यासाठी आवश्यक निविदा काढण्यात याव्या तसे अर्थसंकल्पात दिलेल्या अत्पन्नाचे उद्दीष्ट पुर्ण करण्याचे ही स्थायी समिती निर्देश देते यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

**<u>ठराव क्रमांक 215</u>**:— स्थानिक संस्था करा संदर्भात थकबाकी बाबतचा आढावा समितीने विचारात घेवून अर्थसंकल्पात दिलेले उद्दीष्ट पुर्ण करण्याचे निर्देश ही स्थायी समिती देते यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

**<u>ठराव क्रमांक 216</u>**:— नगर रचना विभागाद्वारे दि. 1 एप्रिल, 2018 पासून
<u>{नगररचना विभाग}</u> विभागाकडे सादर करण्यात आलेले रेखाचित्र आज पर्यंतची संख्या, मंजूर रेखाचित्रांची संख्या, नामंजूरीची रेखाचित्रांची संख्या, याद्वारे प्राप्त महसूल याची अद्यावत माहिती व आढावा समितीने विचारात घेऊन मंजूर झाल्यावर ज्या नागरीकांनी जे नियमाप्रमाणे शुल्क भरावयाचे होते त्या देयकाचे भुगतान केले नाही त्यांनी त्यांचे बांधकाम सुरु केले असल्यास त्यांचेवर तातडीने कार्यवाई करावी त्याचा अहवाल पुढीलल स्थायी समितीच्या सभेसमोर सादर करावा असे निर्देश ही स्थायी समिती देते यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

**<u>ठराव क्रमांक 217</u>**:— गुरुवार दि. 09/08/2018 रोजीच्या स्थायी समिती सभेचे सूचना पत्र क्र. 851/समिती दि. 09/08/2018 नुसार स्थायी समितीच्या सभेत जे ठराव मंजूर झालेले आहे अशा प्रकरणांच्या ठरावाची अंमलबजावणी / कार्यान्वीकरण किती दिवसात झाले व ज्या ठरावांची अंमलबजावणी/ कार्यान्वीकरण विभागाद्वारे करण्यात आले नाही त्यांची कारणमिमांसा करुन संपूर्ण अहवाल पुढील स्थायी समितीच्या सभेच्या पटलावर ठेवण्याचे निर्देश देण्यात आले. त्या संबंधीची माहिती व आढावा समितीने विचारात घेऊन स्थायी समितीने आजपर्यंत जे ठराव मंजूर केले त्याची विभागाने तातडीने अंमलबजावणी करावी, तसे महाराष्ट्र महानगरपालिका कायद्यातील कलम 72 (क) प्रमाणे ज्या बाबी नमुद आहे. त्याप्रमाणे जे कर्मचारी व अधिकारी आपल्या कर्तव्य पालनात कसुर करीत आहे. त्यांना नियमाप्रमाणे कारणे दाखवा नोटीस देण्यात यावे असे निर्देश ही स्थायी समिती देते आणखी असे की, या सर्व प्रकरणाचा एकत्रित अहवाल विभागाने पुढील स्थायी समिती सभेपुढे ठेवावा यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

**<u>ठराव क्रमांक 218</u>**:— गुरुवार दि. 09/08/2018 रोजीच्या स्थायी समिती सभेचे सूचना पत्र क्र. 851/समिती दि. 09/08/2018 नुसार विभागाद्वारे पंचवीस लाख रुपयापेक्षा अधिक नसलेल्या खर्च अंतर्भुत असेल अशा आयुक्त यांनी केलेल्या प्रत्येक संविदेची माहिती महाराष्ट्र महानगरपालिकेच्या कलम 73(ड) प्रमाणे स्थायी समितीस कळविणे आवश्यक आहे. आज पर्यंत अशा किती संविदा करण्यात आल्या त्याची सर्व विभागवार माहिती स्थायी समिती सभेच्या पटलावर ठेवावी असे निर्देश देण्यात आले. त्या संबंधीची माहिती व आढावा समितीने विचारात घेवून महाराष्ट्र महानगरपालिकेच्या कलम 73 (ड) प्रमाणे प्रत्येक स्थायी समितीच्या सभेपुढे विभागाचे संविदाची माहिती रितसर सभेच्या विषय पत्रिकेत समावेश करुन पटलावर ठेवावी असे निर्देश हि स्थायी समिती देते यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

सभापती :— विषय क्र १९८ च्या अनुषंगाने कर व कर आकारणी विभागाने १ एप्रिल २०१८ पासुन करण्यात आलेल्या कामासंदर्भात सविस्तर माहिती दयावी.

सहा.आयुक्त (श्री.मेश्राम) :— मा.सभापती महोदय, सन २०१८—२०१९ चे अंदाजपत्रक मंजूर करतांना मालमत्ता कर व कर आकारणी विभागाकडुन अपेक्षित उत्पन्न ५०९ कोटी आहे. या अगोदर आपल्या अध्यक्षतेखाली सभा झाली होती त्या सभेमध्ये आपण निर्देश दिले होते की, प्रत्येक महिन्याचे त्रैमासिक उद्यीष्ट देण्यात यावे. पहिल्या त्रैमासिकमध्ये २० टक्के वसुलीचे उद्दिष्ट देण्यात आले. दुसऱ्या त्रैमासिकमध्ये २० टक्के वसुलीचे उद्दिष्ट देण्यात आले तर चौथ्या तिमाही मध्ये ४० टक्के वसुलीचे उद्दिष्ट देण्यात आले. त्या अनुषंगाने ११९ कोटी ८२ लक्ष रुपये आजपर्यत वसुल झालेले आहे. दुसऱ्या त्रैमासिकमध्ये ६४.१७ करोड रुपये वसुल झाले आहे त्या अनुषंगाने जवळपास ५०९

कोटीच्या ३४ टक्के उद्दीष्ट गाठायला हवे होते. जवळपास ७८.१५ कोटी रुपये महानगरपालिकेच्या तिजोरीमध्ये यायला हवे पाहिजे होते. उद्दिष्टनिरुप ६१.१७ कोटी रुपये म.न.पा. तिजोरीमध्ये आलेले आहे.

सभापती :— वसुली न होण्याच्या मागचे कारणे काय आहे. या आधी किती देयके दिल्या गेले आहे. पहिल्या ३ महिन्याचे २० टक्के प्लॅनिंग ६ महिन्यामध्ये होत नसल्याचे यावरुन दिसुन येत आहे.

सहा.आयुक्त (श्री.मेश्राम) :— मा.सभापती महोदय, महानगरपालिकेच्या सिमेतील जेवढया मालमत्ता, जमिन व इमारती आहे त्या सर्व बाबींचा जी.आय.एस. बेस डाटा कलेक्ट करण्यासंदर्भात सभागृहाने ठराव क्र ७२ नुसार कर योग्य मुल्य आकारणीची पध्दत अंगीकारली आहे. त्या पध्दतीनुसार प्रत्येक इमारतीचे, प्रत्येक जमिनीचे मालमत्ता कर निर्धारण होणे अपेक्षित आहे. हा जी.आय.एस. डाटा प्राप्त होत आहे त्याला अप्रुव्हल प्राप्त करुन असेसमेंट रजिस्टर प्रिंट करुन २१ दिवसाच्या आत आक्षेप नोंदविणे, त्यानंतर डिमांड दयायची आहे. त्या नुसार २.८१ हजार मालमत्ताचे डिमांड झोननिहाय हस्तांतरीत केले आहे. ५,२८,४४४ प्रॉपर्टीचे डाटा सर्व्हेच्या माध्यमातुन प्राप्त झालेला आहे. ४,२०,६२३ प्रॉपर्टीचा डाटा प्रोजेक्ट झाला आहे. २.८१ हजार डिमाड पोस्ट झाल्या आहे. उर्वरीत डिमांड सप्टेंबर महिन्याच्या शेवटपर्यत पाठविण्यात येईल.

सभापती :— जेवढे उद्दिष्ट स्थायी समितीने दिले आहे त्या हिशोबाने वसुली झालेली नाही. महानगरपालिकेची आर्थिक स्थिती खराब आहे. महानगरपालिकेने दिलेल्या बजेटवर वर्कींग होत नाही. २० टक्के काम ३ महिन्यामध्ये करायचे होते त्या कामाला ६ महिने होवुन सुध्दा ते पुर्ण झाले नाही.

सहा.आयुक्त (श्री.मेश्राम) :— मा.सभापती महोदय, ३० सप्टेंबर २०१८ पर्यत उद्दिष्ट आहे त्या उद्दिष्टानिरुप त्यांनी मालमत्ता कराची वसुली करुन महानगरपालिकेच्या निधीमध्ये जमा करणे गरजेचे आहे. त्या करीता दैनंदीन उद्दिष्टे दिले आहे. ते उद्दिष्टे न गाठल्यास १ ऑक्टोबरला या सर्व गोष्टींचा आढावा घेणार आहे. ज्यांनी उद्दिष्ट गाठले नाही त्यांच्यावर कार्यवाही होणार आहे.

सभापती :— १ ऑक्टोबर रोजी ४० टक्के काम व्हायला पाहिजे.

सहा.आयुक्त (श्री.भिवगडे) :— मा.सभापती महोदय, झोन क्र ३ हनुमाननगर झोन अंतर्गत तिमाहीचे उद्दिष्टे १०.९२ कोटी दिलेले आहे त्यापैकी ५.४ कोटी रुपये वसुली झाली आहे. ५० टक्के रिकव्हरी झालेली आहे. दिलेले उद्दिष्ट पुर्ण होणे कठीन आहे. वारंट कारवाई केली आहे. मागच्या बैठकीमध्ये दिलेल्या निर्देशाप्रमाणे वारंट कारवाई आणि जप्तीची कारवाई करणे सुरु आहे.

सभापती :— निर्देश स्पष्ट आहेत. सहा.आयुक्तांनी त्यांच्या टीममध्ये काय बदल करावयाचे आहे ते करावे. आम्हांला आऊटपुट पाहिजे आहे. वसुली करण्यास काही अडचणी येत असतील तसे आम्हांला सांगावे. परंतु स्थायी समितीने दिलेले उद्दिष्टे पुर्ण करावे. टॅक्स कलेक्शनच्या संदर्भात इतर शहराच्या बाबतीत चर्चा झाली. त्यामध्ये इंदोर शहरातील दर नागपूर शहराच्या तुलनेमध्ये कमी आहे. इंदोर शहरामध्ये ४५० करोड रुपये टॅक्स कलेक्शन प्रत्येक वर्षी येत आहे. या वर्षी ५०० कोटी रुपये जमा होईल असे त्यांनी सांगितले. या अगोदर अकोला, नाशिक, नवी मुंबई, अमरावती महानगरपालिकचे उदाहरण येथे दिलेले आहे. महापालिकेच्या स्थायी समितीने दिलेले उद्दिष्ट आहे. अधिकारी वर्गाने याकडे लक्ष दिले पाहिजे. आम्ही टीममध्ये बदल करण्याचा अधिकार दिला आहे. आता वसुली आली नाही ही सुनावणी होणार नाही की ऑक्टोंबर महिन्यापर्यंत आम्ही सर्व प्रयत्न केले परंतु झाले नाही. आजपावेतोच्या तारखेपर्यंत मागच्या वर्षी किती उत्पन्न होते ते सांगावे.

सहा.आयुक्त (श्री.मेश्राम) :— मा.सभापती महोदय, मागच्या वर्षीपेक्षा ५ करोड ५८ लक्ष रुपयांनी यावर्षी मागे आहे.

सभापती :— याचा ब्लेम कुणावर जाणार आहे. मागच्या वर्षी अशी परिस्थिती निर्माण झाली होती टॅक्स वाढला पाहिजे, नाही वाढला पाहिजे या संदर्भात संभ्रम निर्माण झाला होता. त्यामुळे टॅक्सची वसुली कमी झाली परंतु या वर्षी असा कोणताही त्रास नाही. यावर्षी डिमांड जनरेट झाली आहे. मग हा आपला दुर्लक्षपणा आहे. नागरिक टॅक्स भरायला तयार आहे. झोनमध्ये इंटरनेट कनेक्शन राहत नाही. सहा.आयुक्तांनी जी टिम तयार केली आहे त्या टिमला काम करावे लागेल. जर दिलेले उद्दिष्ट पुर्ण होत नसेल तर अधिकारी/कर्मचारी यांनी कारवाईसाठी तयार रहावे. या संदर्भात आयुक्तांशी चर्चा करुन यावर त्वरीत कारवाई करावी.

श्री.मनोज सांगोळे :— मा.सभापती महोदय, जितके काही कर्मचारी लागत असतील ते त्यांना वाढवून देण्यात यावे. टॅक्स गोळा करणा—या कर्मचा—यांना सुविधा पुरविण्यात याव्यात, त्यांना वाहने देण्यात यावे, यंत्रणा स्ट्रॉग करण्यात यावी. जेव्हा आपले कर्मचारी लोकांच्या घरी टॅक्स मागायला जातात तेव्हा ते नागरिक म्हणतात की येथे लाईटची व्यवस्था नाही, रोडला खड्डे पडले आहे त्यामुळे ते नागरिक टॅक्स भरण्यास तयार होत नाही. विभागाला जो स्टॉफ लागत असेल त्याची मागणी करावी.

सहा.आयुक्त (श्री.मेश्राम) :— मा.सभापती महोदय, ४५६ कर्मचारी आस्थापनेवर मंजूर आहे. नागपूर शहराचा बराच व्याप वाढला आहे. त्यानुसार प्रॉपर्टी सुध्दा वाढली आहे. त्या अनुषंगाने मालमत्ता कर व कर आकारणी विभाग ५० टक्के स्ट्रेन्थवर काम करीत आहे. ९२ कर्मचारी काम दुस—या विभागात करीत आहे आणि पगार कर व कर आकारणी विभागातुन घेत आहे. या अनुषंगाने प्रस्ताव पुटअप केला आहे.

सभापती :— पुढील स्थायी समितीच्या सभेमध्ये आयुक्तांना बैठकीकरिता बोलावून घ्यावे.

सहा.आयुक्त (श्री.मेश्राम) :— मा.सभापती महोदय,कर्मचारी मिळण्यासंदर्भात सामान्य प्रशासन विभागाला मागणी या अगोदरच केलेली आहे.

श्री.मनोज सांगोळे :— मा.सभापती महोदय, कर्मचारी देण्यासंदर्भात काय अडचणी आहे त्यासंदर्भात सहा.आयुक्त, सामान्य प्रशासन विभाग यांनी माहिती दयावी.

सहा.आयुक्त (श्री.धामेचा) :— मा.सभापती महोदय, नागपूर महानगरपालिकेत जेवढे मंजूर पदे आहे त्याच्या दोन तृतीआंश स्ट्रेन्थवर सर्व विभाग काम करीत आहे. सर्व विभागामध्ये कर्मचा—यांची कमतरता आहे. आता शासनाकडे नविन आकृतीबंध कर्मचा—यांची संख्या निश्चित करुन पाठविली आहे.

सभापती :— महानगरपालिकेच्या उत्पन्नाची परिस्थिती लक्षात घेता पुढील स्थायी समितीच्या सभेपुर्वी निगम आयुक्तांनी सर्व बाबींचा अभ्यास करुन अहवाल सादर करावा.

सभापती :— विषय क्र. ११९ च्या अनुषंगाने बाजार विभागातील उत्पन्नाच्या संदर्भात आढावा दयावा.

सहा.आयुक्त (श्री.हुमणे) :— मा.सभापती महोदय, आर्थिक वर्षात ७.५ कोटीचे उद्दिष्ट होते. ६४ लक्ष रुपयांची वसुली झालेली आहे. टोटल १३.१५ कोटीचे उद्दिष्ट होते त्यानुसार रिकव्हरी १ करोड ६१ लक्ष रुपये झालेली आहे. डिमांड रिव्हाईज केली आहे. रेडीरेकर नुसार सर्वांना डिमांड पाठविली आहे. रिवाईज टारगेट २५ करोड ५२ लक्ष रुपये आहे.

श्री.जुल्फेखार भुट्टो :— मा.सभापती महोदय, स्थायी समितीने दिये हुये उद्दिष्ट के तुलने मे अब तक कितनी आय महानगरपालिका के तिजोरी मे आना चाहिये।

सभापती:— म.न.पा. चे एकुण किती मार्केट आहेत आणि किती वर्किंगमध्ये आहेत त्या संदर्भात माहिती देण्यात यावी.

सहा.आयुक्त (श्री.हुमणे) :— मा.सभापती महोदय, महानगरपालिकेमध्ये एकुण ६४ मार्केट आहे. त्यातील सर्व दुकानदारांनी डिमांडवरती आक्षेप घेतला आहे. एकुण २००० आक्षेप प्राप्त झाले आहे आक्षेपावर रिप्लाय देणे सुरु आहे.

श्री.मनोज सांगोळे :— मा.सभापती महोदय, माझ्या प्रभागात आठवडी बाजार लागतो. बाजारात दुकान लावणारे कचरा करतात आणि बाजाराची सर्व साफसफाई ही महानगरपालिकेकडून करावी लागते. त्यामुळे आठवडी बाजार धारकांवर साफसफाई कराची वसुली केली पाहिजे.

सभापतीः— दुकानदारांनी डिमांड वर आक्षेप घेतल्यानंतर बाजार विभागातर्फे कोणती कार्यवाही करण्यात आली त्या संदर्भात माहिती दयावी.

सहा.आयुक्त (श्री.हुमणे) :— मा.सभापती महोदय, २००० लोकांना रिप्लाय दिला आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७९ (डी) अंतर्गत कारवाई केली आहे. त्यामध्ये असे नमुद आहे की, बाजारभावापेक्षा कमी मुल्य असु नये असा स्पष्ट नियम आहे.

सभापती :— नागपूर शहरात जे म.न.पा. मार्केटच्या जागेवर अतिक्रमण झाले आहे ते १ महिन्याच्या आंत काढण्यांत यावे. ॲन्युटी बेस चार्ट तयार करुन दर महिन्यात कार्यवाही करण्याकरीता सेपरेट टिम तयार करावी त्या अनुषंगाने नियोजन करावे. अतिक्रमण कार्यवाहीचा डेली चार्ट बनविण्यात यावा. महिन्याचे शेडयुल्ड बनविण्यात यावे. एक महिन्यानंतर जी चौथी स्थायी समितीची बैठक येईल त्या बैठकीमध्ये हा विषय ठेवण्यात यावा. किती बाजारातील अतिक्रमण काढले त्याचा संपुर्ण अहवाल देण्यात यावा. आठवडी बाजाराच्या संदर्भात आयुक्त महोदयांशी चर्चा करून विभागाने त्या धर्तीवर पॉलिसी बनविण्याच्या अनुषंगाने एक महिन्यात ड्राफ्ट तयार करून स्थायी समितीकडे पाठवावा त्यावर आवश्यक ती कार्यवाही स्थायी समिती मार्फेत करण्यात येईल.

सहा.आयुक्त (श्री.हुमणे) :— मा.सभापती महोदय, हा सर्व रेकार्ड हेल्थ विभागाकडून येणे अपेक्षित आहे.

सभापती :— विषय क्र. २००च्या अनुषंगाने स्थावर अधिकारी यांनी सविस्तर माहिती दयावी.

श्री.भुते (स्थावर अधिकारी):— मा.सभापती महोदय, १७ कोटीचे टारगेट होते. रिवाईज ५६५ लक्ष रुपये भरले. ५१० लक्ष रुपयांची मागची रिकव्हरी होती. या वर्षी १७ कोटीचे टारगेट दिलेले आहे. २३० लक्ष रुपयांची आतापर्यंत रिकव्हरी झालेली आहे.

सभापतीः— आप पिछले साल के हिसाब से चल रहे क्या?

श्री.भुते(स्थावर अधिकारी):— मा.सभापती महोदय, स्थावर विभागाचा लिज नुतणीकरणाचा एक मेन सोर्स आहे. एकुण ३७०० प्रॉपर्टी आहे त्यामधुन २८ प्रॉपर्टी अशा आहे की ती आवटन हायर परचेस बेसेस वर आवंटीत झाले आहे. अनधिकृतरित्या २५—३० वर्षापासून त्या ठिकाणी राहत आहे ते रेगुलराईज झालेले नाही. त्यांना रेग्युलाईज करण्याकरिता आजच्या रेटने पैसे भरावे लागणार आहे त्यात मोठया प्रमाणात वाढ होत आहे. याकरिता हाउस मध्ये पॉलिसी गठीत करण्याचे स्थापत्य व विद्युत विशेष समितीला सांगितले होते त्या अनुषंगाने आजच स्थापत्य व विद्युत विशेष सभेच्या बैठकीत चर्चा झाली. याकरिता एक पॉलिसी तयार करावी लागेल त्याला महानगरपालिकेची मंजूरी घ्यावी लागेल तेव्हाच या प्रॉपर्टी नेटमध्ये येईल.

सभापतीः— जे लोग अनधिकृत रित्या तेथे राहत असेल त्यांचे पुरावे आपल्या जवळ आहे त्यांनी म्युटेशन केलेले नाही तर त्यांच्यावर विभागातर्फे कारवाई करण्यात यावी तेव्हाच स्थायी समितीने दिलेले उद्यीष्टे हे पुर्ण होवु शकेल.

श्री.भुते(स्थावर अधिकारी):— मा.सभापती महोदय, काही जोड प्रापर्टी आहेत, अनऑथराईज प्रापर्टी रेग्युलाईज करण्याकरिता त्यांना डिमांड दिली आहे. ८०—९० लक्षाची डिमांड गेलेली आहे.

सभापती:— पॉलीसी फायनल रिवाईज होके आयेगी उसके पहिले पुराने पॉलीसी की नुसार १७ कोटी का टारगेट पुरा करना है, वह किजीये । जब नई पध्दत आयेगी तब वो पध्दती से किजीये ।

श्री.भुते(स्थावर अधिकारी):— मा.सभापती महोदय, मागच्या चार महिन्यापासून या विषयाला टारगेट करीत आहे.

सभापती:— नीचे काम करने वाले कर्मचारी को ट्रेन करना पडेगा । इस सबकी पॉलिसी बनानी होगी ।

श्री.भुते(स्थावर अधिकारी):— मा.सभापती महोदय, कन्झरवंशी लेंथकरिता शासनाकडून, महानगरपालिकेकडून जी जागा दिली आहे. यात सुध्दा रेटच्या अनुषंगाने प्राब्लेम येत आहे. लोक त्याचे पैसे भरण्यास तयार नाही. कन्झरवंशी लेंथ घेणे बंधनकारक आहे परंतु लोक त्याकरिता तयार नाही.

सभापती:— इसमे स्थायी समिती का एक सुझाव है । जहां जहां कंन्झरवंसी लेंथ ॲक्वायर की गई है उनपर कंन्झर्व्हसी लेंथ ॲक्वायर करने की कार्यवाही की जाये । कन्झर्व्हसी लेंथ के बारे मे झोननिहाय बायफरकेशन कर के उस संदर्भ मे पॉलिसी बनाये । और स्थावर विभाग मे जुने दस्ताऐवज स्कॅनिंग करणे का काम एक महिने के अंदर पुरा कर ले उसके लिए आवश्यक निविदा निकाली जाये । स्थावर विभाग के लिए बजेट मे दिया हुआ टारगेट पुरा किया जाये ।

सभापती :— विषय क्र. २०१ च्या अनुषंगाने संबंधित विभाग प्रमुखांनी सविस्तर माहिती दयावी.

सहा.आयुक्त (श्री मेश्राम) :— मा.सभापती महोदय, एल.बी.टी. विभागाला सन २०१८—२०१९ मध्ये स्थायी समितीने २२.६१ कोटी रुपयांचे उद्दिष्टे दिले होते त्यातील १.५५ लक्ष रुपये प्राप्त झाले आहे. इसमे अससमेंट के बारे मे लोगों का ऐसा मानना है की अब एल.बी.टी खतम हो गया है। लोगों में इतना जागृती नही है की अपना रिटर्न क्लीअर करवाये । डिलर को हम सुचित कर रहे है । इसमें कॉग्नीजंस लेकर ५५८ लोगों पर नोटीस दिया है । जिन्होने लिया उन १२८ लोगों पर हमने नोटीस की ॲक्शन लिया है । याने बेस जजमेंट भी कर रहे है। रेगुलर अससमेंट भी कर रहे है । उस माध्यम से हम रिकव्हरी कर रहे है।

सभापती :—जिन लोगों का अकाउंट सिज किया है । उन लोगों का हो गया डिस्बरमेंट की बात करके पैसा वसुला जा सकता है ।

सहा.आयुक्त (श्री मेश्राम) :— मा.सभापती महोदय, जिन लोगों के अकाउंट अपने सिज किये उनमे से बहोत लोगों के अकाउंट में पैसे नही है । डिपार्टमेंट ने उन लोगों के और कही अकाउंट है क्या इस बारेमें बॅक से जानकारी मागी है ।

सभापती :— स्ट्रांगली प्रोसेसको आगे बढाओं । इसपर ध्यान दों हमकों उनसे पैसा लेना है । हमने उनकी कितनी डिमांड जनरेट करके रखी है ।

सहा.आयुक्त (श्री मेश्राम) :— मा.सभापती महोदय, रेगुलर बेसीसपर बेस जजमेंट एक्सपार्टी ऑडर हुये है । इसमेंसे हमने ७६० कोटी की डिमांड जनरेट की है । उसमें ११८५ लोग अपील में गये है । उसमेंसे ३७४ अपीलंट अथॉरीटी में हमको रिअसेसमेंट किजीये करके डिमांड बॅक की है। इसमे जो आउट स्टॅडींग डिमांड दिख रही है वो बेस जजमेंट की है ।

सभापती :— इसमें से ॲक्चुअल फिगर ले आईये । इसमें १ लाख, २ लाख के उपर कितीने अकाउंट है, उनको अगर आप बुलाकर करवॉ लेगें तो जादा अच्छा होगा । कितने कंझुमर है ३८८ करोड में ऐसें ।

सहा.आयुक्त (श्री मेश्राम) :— मा.सभापती महोदय, ३८८ करोड में १२०० कंझुमर है । उसमें बेस जजमेंट हुआ है । जिनका आउटसाईड बिसनेस है। जिनकी इंडस्ट्री आउटसाईड मे है और ऑफीस शहर में है । वो एलबीटी मे डीम रजिस्टर है । उन लोगों

ने कुछ कॉग्नीजंस नही लेने के कारण ऐसे १२००  लोग है जिनके तरफ ३८८ करोड का आउटस्ँडींग है ।

सभापती :— एल.बी.टी. विभाग मे कितने कर्मचारी अभी काम कर रहे है।

सहा.आयुक्त (श्री मेश्राम) :— मा.सभापती महोदय, एलबीटी में ४३ कर्मचारी काम कर रहे है । एल.बी.टी विभाग मे बहोत जादा काम है। सन २०१५—२०१६, २०१६—२०१७ का भी असेसमेंट कंम्पलीट करना है। असेसमेंट करने का काम चालु है उसके बाद डिमांड जनरेट करेंगे।

सभापती :— लोग तो १२०० ही है ना ।

सहा.आयुक्त (श्री मेश्राम) :— मा.सभापती महोदय, सन २०१४—२०१५ से निअर अबाउट ४१,००० डिलर एल.बी.टी. में रजिस्टर है । इन लोगों पर मुझे असेसमेंट की कार्यवाही करना है । उसमें से जो कारवाई हुई उसमें सें १२०७ लोगों के तरफ ३८८ हुये है ।

सभापती :— मुझे लगता है इन चिजों को अच्छी तरह से निपटाईये । जितनी रिकव्हरी हो सकती है उतनी करवाईये ।

सहा.आयुक्त (श्री मेश्राम) :— मा.सभापती महोदय, अपने पास में वही हथीयार है की इनको बेस जजमेंट करु और डिमांड दु ।

सभापती :— इसमें आप बिल्कुल फ्रि हो जों भी करना है कीजिये । इसमें अच्छी डिमांड हमकों हासील होनी चाहिये । इसमें ७५ करोड अपनें को मिलना है । जितना टार्गेट है उतना कंम्प्लीट करना है ।

सभापती :— विषय क्रमांक २०२ च्या अनुषंगाने  संबंधित अधिकारी यांनी सविस्तर माहिती दयावी.

सहा.संचालक नगररचना (श्री.गावंडे) :— मा.सभापती महोदय, सन २०१८—१९ चे ११०.२५ कोटीचे टारगेट दिले होते. एकुण २७५ प्रकरणे आहेत. मंजूर प्रकरण ९७ आहेत. नामंजूर प्रकरण १५९ आहेत. १९ प्रकरणात कार्यवाही केली आपण जे मागणी पत्र दिले होते ते ३०.५८ कोटीचे दिले होते त्यापैकी आतापर्यन्त आपल्याला १२.८४ कोटी आले आहे. बाकी १७.२६ कोटीचे येणे आहे. ज्या कडे थकबाकी आहे अशा लोकांना आपण पत्र दिले आहे की त्यांनी ७ दिवसाचे आत पैसे भरावे असा नोटीस देण्यात येत आहे. त्या माध्यमातुन कम्पोडींग स्ट्रक्चर मध्ये आपल्याला येणे आहे.

सभापती :— १७ कोटी बाकी है, इसमें बडे लोग है । इसमे एखादी १ करोड की कोई डिमांड है क्या ?

सहा.संचालक नगररचना (श्री गावंडे) :— मा.सभापती महोदय, इसमें १ करोड की डिमांड है इसमें अलग अलग महिने पैसे भरने के बाद ही कोई अपने तरफ आता है । दोन—तीन लोगो ने भरे है

सभापती :— वो ठिक है । इसमे हमकों हमारा पैसा चाहिये की नही । जिसका प्लॅन सबमीट हो गया । मंजूर हो गया उसके बाद भी वो पैसे नही भर रहे यह बडे सोचनेवाली बात है ।

सहा.संचालक नगररचना (श्री गावंडे) :— मा.सभापती महोदय, आपण सर्वांना पत्र दिले आहे. आपण त्यांना पत्र देतों की ही डिमांड भरण्यात यावी.

अति.आयुक्त (श्री. रवींद्र ठाकरे):—मा.सभापती महोदय, डिमांड दिल्याने प्रश्न सुटत नाही. ३० दिवसाचा कालावधी झाला असेल तर त्या पुढची कार्यवाही केली पाहिजे. दप्तरी दाखल केल्याशिवाय आपण पुन्हा पुन्हा मागणी करतो. पुढची कार्यवाही न झाल्यामुळे महापालिकेचे पैसे प्रलंबित राहिले. जी कार्यवाही करणे अपेक्षित आहे ती दप्तरी केल्याशिवाय कसे होणार आहे.

सहा.संचालक नगररचना (श्री गावंडे) :— मा.सभापती महोदय, दुसरा पर्याय शिल्लक राहत नाही.

सभापती :— ऐसे कितने लोग है जिन्होने बिल्डींग का काम सुरु कर दिया और पैसा नही भरा है ।

सहा.संचालक नगररचना (श्री गावंडे) :— मा.सभापती महोदय, ते तपासुन पहावे लागेल. या हेड खाली १७ कोटी येणे आहे.

सभापती :— इसके अंदर में कितने लोगों ने बिल्डींग का काम सुरु किया । १५ दिन के अंदर में ये १७ कोटी वालों को तुम बताओं । अगर सुरु किया है तो नियमाप्रमाणे तुरंत कार्यवाही करना चाहिये । बिल्डींग प्लॅन सॅग्शन नही हुआ और हमने साईडपर काम सुरु कर दिया । इसपर जो भी है नियमाप्रमाणे उसकी कार्यवाही करना चाहिये । दुसरा ये १७ करोड जिसमें ९० परसेंट प्रोसेस कंम्पलीट हो गई । बाकी सब सेटल हो गया ।

सहा.संचालक नगररचना (श्री गावंडे) :— मा.सभापती महोदय, याला आपण तत्वत: मंजूरी देतों आणि फायर परमीशनसाठी अग्नीशन विभागाकडे त्यानंतर ते जाते. ते पुर्ण झाल्यानंतर डिमांड निघते.

सभापती :— सभी बिल्डींग चेक करके जिसने काम शुरु किया होंगा उससे वसुली करो। ये सब लोग आपके परिचय के होंगे। वह लोग पिछले काफी समय आपके डिपार्टमेंट से जुडे हुये है। उनसे बातचीत करके करों और उनसे वसुली करों।

श्री.मनोज सांगोळे :— मा.अध्यक्ष महोदय, याची वर्तमानपत्रात जाहिरात देण्यात यावी. कारण की लोग सतर्क झाले पाहिजे. कर्मचा—यांचा स्टॉफ नसेल तर ते आपले रिटायर्ड झालेले कर्मचारी आहेत त्यांच्याशी बोलणे करावे.

सभापती :— यह जो २७५ केसेस अपने पास है उसमें से ७७ क्लीअर हुये बाकी का क्या इश्यू है ।

सहा.संचालक नगररचना (श्री गावंडे) :— मा.सभापती महोदय, काही अश्या केसेस आहेत ज्या मध्ये त्यांचे कागदपत्रे क्लीअर नाही. त्याची मालकी हक्काची कागदपत्रे, लीज, सेलडीड, रिनिव्हल कागदपत्राच्या अभावी स्ट्रक्चरमध्ये हमी द्यावी लागेल. महत्वाचा मुद्दा टेबल क्रमांक २८ चा होता त्याला शासनाकडे पाठविला आहे. ४ जी प्लस १ आलरेडी यात आपण रिलॅक्सेशन करीता पैसे घेतलेले आहे.

सभापती :— झोन और टाऊन प्लॉनिंग का जॉइंटली चलनेवाले काम है। इस बारे में आप लोगों को कुछ पता है कि ऐसा ही चलने वाला है । अगर हम चर्चा में सहभागी नही होगें तो कौनसे मुद्दे मे प्रॉब्लेम है यह पता नही चलेगा।

श्री.मनोज सांगोळे :— मा.सभापती महोदय या संदर्भात सहा.आयुक्तांनी आपले मनोगत सांगावे. त्यांनी ५३ ची नोटीस दिली आहे त्यांना याची माहिती असली पाहिजे. तुमच्याकडे असे किती केसेस आहे. सर्व वार्ड ऑफिसर बसले आहे त्यांची माहिती काढावी.

सभापती :— ६ तारीख को इसपर सेपरेट टाऊन नगरररचना विभाग की मिटींग लगायेंगें । इस मिटींग मे सभी सहा.आयुक्त, नगररचना विभाग के अधिकारी, रहेगें । जिसके अंदर में गावंडे साहाब आपके जितने भी विषय है । इसमें कितने रिजेक्ट हूये है उसमें क्या हुआ है उसपर हम चर्चा करेगे । अपना टार्गेट कितना था ।

सहा.संचालक नगररचना (श्री गावंडे) :— मा.सभापती महोदय, ११०.२५कोटी का टारगेट है ।

सभापती :—इसमें कम्पोंडीग भी आ गया है?

सहा.संचालक नगररचना (श्री गावंडे) :— मा.सभापती महोदय, वह अलग है ।

सभापती :— टार्गेट जब हम टाउन प्लॉनीग के बारे में बोलेगें वो तो दोनो पकडकर बोलना चाहियें। इसमें अपने क्रॉनीकल केस होगे उसका डिपार्टमेंट हमने बंद कर दिया है क्या?

सहा.संचालक नगररचना (श्री गावंडे) :— मा.सभापती महोदय, डिपार्टमेंट हमने बंद नही किया २५ — ७ पहले की पुरानी जो केसेस है । जिसकी स्कृटीनी हुई है वो चालू है उसपे कार्यवाही शुरू है । बाकी मॅन्युअली शुरू है ।

सहा.संचालक नगररचना (श्री गावंडे) :— मा.सभापती महोदय, ऑर्कीटेक्टच्या अंगवळणी पडलेले नाही. कम्पाऊडिंगच्या केसेस मध्ये जे आपल्याला प्रशमन शुल्क आकारावयाचे होते डेव्हलपमेंट शुल्क त्या वेळेस शासनाने १० टक्के, ५ टक्के असे ठरवून दिले होते. त्या अनुषंगाने रेट ठरवावे लागेल. त्या भागातील रेट ठरवायच्या आधी त्याची अधिसुचना प्रसिध्द झालेली आहे. कम्पाऊडिंग केसेस उपलब्ध आहेत ते आता निकाली काढता येणार नाही. आपण ठरविलेल्या दरानुसार कमी जास्त होत असेल तर दबाव राहणार.

सभापती :'— जो रेट उन्होने कम्पौडींग करने के लिये दिये थे अब उसमें शिथीलता करने का अधिकार हमको है ।

सहा.संचालक नगररचना (श्री गावंडे) :— मा.सभापती महोदय, ५ परसेंट, १० परसेंट दिये थे विकास के लिये उन्होने यह अधिकार नियोजन प्राधिकरण को दिये थे ।

सभापती :— इसमें अपने को एक ठराव लेना था और शासन को भेजना था । नागपूर में रेट बहोत जादा है। यहॉ १५०० स्केअर फिट के नंदनवन साईड के फ्रेड्स कॉलनी जाईये, इंदोरा के रेट एकसे हो गये है। इसमें थोडा बहोत कम्पोंडीग स्ट्रक्चर आ गया। आज किसी को डिमांड जो जा रही १५०० स्केअर फिट की १० लाख रुपये वह बहोत जादा है । इसके बारे मे शासन को हम लेटर भेजने वाले थे, इसकी आप स्टडी करलो।

सहा.संचालक नगररचना (श्री गावंडे) :— मा.सभापती महोदय, आपण शासनाला पत्र लिहिले आहे.

सभापती :— विषय क्रमांक २०३ के संदर्भ में स्थायी समिती मे जो ठराव हुये थे । उसका क्या हुआ किसकी अंमलबजावणी हुई ?

निगम सचिव :— मा.सभापती महोदय मा.स्थायी समिती व्दारा जो विषय मंजूर किये जाते है और उसको क्रियान्वीत करने की कारवाई के लिये संबंधित विभाग को प्रेषित कर दिये जाते है । कार्यान्वित करने के लिए उस डिपार्टमेंट को भेजा है ।

सभापती :— ९ अगस्त को एक सर्कुलर निकाला था। उसका १९ तारीख को हमको रिप्लॉय दिया है । उसका रिप्लाय कितने दिन में आना चाहिये उसका रुल क्या है । यह जो आपने भेजा है इसके अंदर में मंगलवारी झोन का रिप्लाय आया है । इसकी कॉपी है क्या? विषय क्र. २०३ मे कलम ७२ क का वाचन किया जाये ।

निगम सचिव:— (वाचले)

सभापती :— विषय क्र. २०३ में इसमें जो दिया है इसके अंदर में ७२ क नुसार जो ठराव लिये थे वे इम्प्लीमेंट हुये क्या ?

निगम सचिव:— मा.सभापती महोदय, जैसे हाउस के विषय अंमलबजावणी के संबध में हमने एक कमेटी का गठन किया है । उसमें एक महिने के अंदर में पिछले जितने भी विषय दिये जाते है उसका एटीआर हमारी तरफ से जाता उसका फिडबॅक भी हमारी तरफ आता है । अगर हमने ऐसी कोई समिति गठीत किया तो उसका भी फिडबॅक लिया जा सकता है।

सभापती :— इसके बारमें एम.एम.सी. ॲक्ट में क्या प्रोव्हीजन है उसके बारे में जानकारी लीजिये । वह मुझे बताईये उसको भी हम तयार कर लेगें । इसके पहले हमने जितने ठराव यहॉ लाये थे इसपर इम्प्लीमेंटेशन नही हुआ उसके बारे में हमको बताईये । जिन्होने ऐसी गडबड की है और इम्प्लीमेंटेशन ठराव का नही हुआ है । उनको शोकॉज नोटीस इश्यु करना है ।

सभापतीः— विषय क्रमांक २०४ मे जो स्थायी समितीमे जो ठराव हुये है उसमेसे आजतक कितने वर्कआर्डर नही हुये । उसकी सविस्तर जानकारी दी जाये ।

अधिकारी (मंगळवारी झोन):— मा.सभापती महोदय, विषय क्र .२०३ मध्ये ३ विषय असे आहेत. मंगळवारी झोनचा विषय आहे. ठराव क्र. ३६ झाला होता. सन २०१८—१९ चे बजेट मंजूर झाले. ती फाईल संबंधित अधिका—याकडे प्रोव्हीजनकरिता पाठविली. फाईल वापस आली होती. नवीन वर्षाच्या बजेटच्या प्रावधानामध्ये नोंद घेवू नंतर सादर करावी एवढे डायरेक्शन होते.

श्री.मनोज सांगोळे :— ही जी फाईल आहे ती फाईल प्रावधान नोंदणीकरिता पाठविली आहे.

सभापती :— इसमें जो हमारा ठराव है वही स्वंयभु है। नया बजेट आया इसके अंदर में हमारा जो ठराव है स्थायी समिती का वह ठराव है । आप पढों एक बार और आपने वह भेजा क्या ?

श्री.मनोज सांगोळे :— त्यांचे म्हणणे असे आहे तो ठराव प्रावधाना करीता स्थायी समितीकडे तुम्ही पाठवावयाला पाहिजे होते. ते न पाठविल्यामुळे अंमलबजावणी झाली नाही. असा स्पष्ट उल्लेख त्यामध्ये आहे.

सभापती :— स्थायी समिती यह सैविधानीक बॉडी है जिसके अंदर का आया हुआ ठराव यह जो आपने पढा इसके आधारपर कलम ७२ "क" के हिसाब से यह अपनी एक प्रोसेस है यह प्रोसेस आप लोगों ने इसतरह से इम्प्लीमेंट करना चाहिये । आप लोग सब इतने सिनीयर लोग है । इसमे प्रोसेस क्लीअरकट ठहरी हुई है । उसको हम क्यों रोकना चाह रहे है । मुझे बताईयें मैं सही में जानना चाहता हूॅ । इतने सारे लोग परेशान है लोगों के काम नही हो रहे है । इतने क्लीअर इन्स्ट्रक्शन होने के बावजुद में अपने ठराव क्लीअर नही हो रहे है । इसमें अडचन क्या है मुझे बताईये । अपना बजेट मंजूर हो गया क्या?

श्री.मनोज सांगोळे :— मा.अध्यक्ष महोदय अपना जो ठराव सभागृह में मंजूर हुआ था उसका इम्प्लीमेंटेशन हुआ की नही हुआ वह भी जानकारी दिजीयें।

सभापती :— प्रमुख लेखा व वित्त अधिकारी इसके बारे मे जानकारी दिजीयें।

प्रमुख लेखा व वित्त अधिकारी (श्रीमती मोना ठाकुर) :—मा.अध्यक्ष महोदय, जो बजेट पारीत झाला त्यानुसार महापालिकेची आर्थिक परिस्थिती आणि येणारा रेव्हेन्युने येणारा पैसा याची सांगड घालून परिपत्रक काढण्यात आले होते. वार्ड फंडातील बांधील खर्च मुक्त केला आहे. त्या सोबतच महापौर फंड, उपमहापौर फंड, स्थायी समिती फंड अंतर्गत नाला दुरूस्ती, भिंत दुरूस्ती या पदाअंतर्गत जे काही महत्वाचे प्रोजेक्ट आहे त्या सर्वांचेच फंड मुक्त केले आहे.

श्री.जुल्फेखार भुट्टो :— मा. सभापती, यहाॅ जो स्टॅडींग कमेटी के चेअरमन ने पैसे दिये है उसपर जो प्रोव्हीजन का ठप्पा लगता है। जो प्रोव्हीजन देते है वह बताते है की उन्होने बंद करके रखा है ।

प्रमुख लेखा व वित्त अधिकारी (श्रीमती मोना ठाकुर) :— मा.सभापती महोदय, जे काही थांबलेली प्रोव्हीजन होती ती मुक्त केली आहे. आताच रेव्हेन्युचा आढावा घेतला तर आपल्या लक्षात आले असेल की महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती कशी आहे.

सभापती :— मा.सदस्य ने पुछा की बजेट अपना इम्प्लीमेंट हुआ की नही हुआ । यह जो ५—६ हेड आपने रोक दीयें है वह कौनसे कलम के आधारपर रोके है इसके बारे मे आप जानकारी दिजीये। ऐंसी कही अॅक्ट में प्रोव्हीजन होंगी तो बताईये । आर्थीक अडचन जो है वो आर्थीक अडचन यह फायनंस डिपार्टमेट देखेगा । अपना बजेट अगर मंजूर हुंआ है । बजेट मंजूर होने के बाद जो वर्कींग होनी चाहिये वह अॅक्ट में कहा है वह आप बताईये ।

श्री जुल्फेखार भुट्टो :— मा. सभापती महोदय बजेट मंजूर होकर एक महिना हुआ और आर्थीक अडचन आ गई। आर्थीक अडचन थी तो वो बजेट को मंजूरी कैसे दी गई

सभापती :— लेखा विभाग ने जो हमको बजेट बनाकर दिया लास्ट ईअर का अपना कलेक्शन होने के पहले आपने जो दिया हमको १८—१९ का बजेट अंदाजे दिया। उसमें कुछ प्राब्लेम होता उसके बारे मे हमको बताते तो ठिक है । शुरुवात होने के पहले हम कहेगें की ये हेड हम नही खोलेगे । यह सब कौनसे ॲक्ट के आधार पर किया आपने उसका थोडा सा खुलासा कीजिये ।

प्रमुख लेखा व वित्त अधिकारी (श्रीमती मोना ठाकुर) :—मा.सभापती महोदय, ३५० कोटीचे दायित्व देने अजुनही बाकी आहे. हे विचारात घेता आणि नविन दायीत्व पुन्हा तयार करणे हे विचारात घेता हा निर्णय घेण्यात आला आहे.

सभापती :— ॲक्ट में ऐसा कोई प्रोव्हीजन नही है । बजेट अगर मंजूर हो गया तो खतेगा क्यों नही । आज अपन खता रहे है तो पैसे आजही देना है क्या ? । जो पुराने पैसे रहे हुये है वो पुरा देने के बारे में सोचकर संविधानीक तरीकेसे लिया हुआ निर्णय है । उस हिसाब से पेमेंट अपनी जायेगी । आजके किये हुये काम के उपर उसमें क्या विषय आता है । उसके बाद भी आज उसको खताते है उसका प्रोसेस टी.ए लेव्हल से जे.ई. लेव्हल से असी. इंजी. झोन लेव्हलपर एक्झीकेटीव्ह लेव्हलपर झोन लेव्हल से सी.ई. है उसके उपर आयुक्त साहाब बैठे हुयें है पुरा सिस्टम बैठा हुआ है । फिर अचानक से एझीस्टींग वर्क को रोकने का क्या कारण है ? अगर अपने में नियम के ॲक्ट में कोई प्रोव्हीजन नही है । फिर भी हम उसको रोक देते है। आप मुझे एक बात बताईये निगम सचिव जी स्टॅडींग के लिये हुये निर्णय में यहॉ जो निर्णय लेते है हम लोग उसके उपर में यहॉ कुछ निर्णय आते है क्या? उसमें कुछ अधिकार है क्या?

निगम सचिव :— ॲक्ट में ऐसा कुछ नही है ।

श्री.जुल्फेखार भुट्टो :— मा.सभापती महोदय यह तो आपके अधिकार का हनन हा गया है।

सभापती :— ॲक्टमें जो प्रोव्हीजन दि गयी है उसका वाचन विभाग ने करना चाहिये। स्थायी समितीने जो निर्णय लिया है उसको इम्प्लीमेंट कीजिये नही करना है तो कौनसे आधारपर नही करते है उसका लिखीत रुप से जवाब दिजीये।

श्री.मनोज सांगोळे :— मा. सभापती महोदय रॉयल्टी के संबंध में मा.महापौरजी ने एक लेटर भेजा था विभाग प्रमुख को विभाग प्रमुख को सुचना दि जाये की यह विषय पत्रीका पर लिया जाये करके ।

सभापती:— मा. महापौरजी के आदेश के अनुसार उसपर कार्यवाही कीजिये वह विषय अगली बैठक में लीजिये । वह विषय डिपार्टमेंट की तरफ से रखीये, अपना जो सेट्रल गव्हर्नमेंट का कॉन्ट्रक्ट हुआ उस कॉन्ट्रक्ट में इस विषय की नोंद हुई है की नही क्यों उनका रॉयल्टी ॲडव्हॉन्स में जमा करना है । इसमें बगैर सोचे समझे अचानक से रॉयल्टी का विषय लाते है । इसके अंदर में हम ऐसी कोई मांग करते नही है । जो व्यक्ति में नागपूर के नागपूर में माल खरीदता है वह रॉयल्टी कैसे देगा इसके बारे में अगली बार डिपाटमेंट विस्तुत माहिती अगली सभा मे रखी जानी चाहिये।

**<u>ठराव क्रमांक 219</u> :—** आजच्या सभेची कार्यवाही कायम करण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

यानंतर मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेची कार्यवाही अनिश्चित काळाकरिता स्थगित केली.

| | |
|---|---|
| निगम सचिव<br>महानगरपालिका,नागपूर | सभापती<br>स्थायी समिती,<br>महानगरपालिका,नागपूर |